**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dirhe.org
E-Mail : dirhe@pn2.Vsnl.net.in

फोन नं.०२० /२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२० /२६१२११५३

क्र.एनजीसी/२००५/४०८३४/कोल्हापूर/मविर ११७९ दिनांक२७/ २ /२००६

संदर्भ-- १. शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/२०९१/(३५६७)/विशी-२अ, दि. ८-८-९१.
२. शासन परिपत्रक क्रमांक- एनजीसी/१०९३/(५९१८)/मशि-३,दि.१९-६-९५.
३. शासन परिपत्रक क्रमांक-मुविसं/१९९६/(विसाअ)/(५०१/९६) मशि-३, दि.५-६-९६.
४.सहसंचालक उच्च शिक्षण, **कोल्हापूर** विभाग **कोल्हापूर** यांचे पत्र क्रमांक.ससं/उशि/कावि/८१७, दिनांक १५-२-२००६.

आदेश

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक- एनजीसी/२०९३/(४७७७)/ युएनआय-२अ. दिनांक १८-१०-९३ अन्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये व संदर्भाधिन सहसंचालक उच्च शिक्षण, कोल्हापूर यांच्या पत्रान्वये केलेली शिफारस विचारात घेवून खालीलप्रमाणे महाविद्यालयाला सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव. | विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष | अनुदान मंजूर केलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| श्री.मुधाईदेवी शिक्षण संस्था,देऊर,ता.कोरेगांव, जिल्हा सातारा | कला महाविद्यालय,देऊर, ता.कोरेगांव,जिल्हा सातारा | कला शाखा (१ तुकडी) | २००५-०६ | १०० टक्के |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांनी अनुदान निर्धारण करून ते अदा करण्यापूर्वी खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे, याची खातरजमा करून घ्यावी.

या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या विद्याशाखेमध्ये परिक्षेला प्रथम वर्षी प्रत्यक्ष बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापिठाच्या निकालपत्रावरून तपासून घ्यावी व ती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी. नंतरच अनुदान निर्धारण करून अनुदान मंजूर करण्यात यावे.

१.या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या प्रत्येक विद्याशाखेतील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील प्रत्येक विजयासाठी शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/ १०९३ /(५९१८)मशि-३, दि. १९-जून, १९९५ व शासन निर्णय दि. १७ मार्च १९९९, अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१.शहरी भाग — २४ विद्यार्थी

२.आदिवासी व दुर्गम विभागातील मुलामुलींची महाविद्यालये, ग्रामीण विभागातील महाविद्यालये आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील महिला महाविद्यालये व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये. — १० विद्यार्थी

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांनी अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध आहेत किंवा कसे, यांची खात्री करून घ्यावी व त्यानंतर त्या विषयासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चावर अनुदान मंजूर करून अदा करावे.

२ अनुदान निर्धारण करतांना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकडयाच विचारात घ्याव्यात.

३ जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे, त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी तपासून नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतरांची पदे मंजूर करावीत.

४. महाविद्यालयास/विद्याशाखेस अनुदान मंजूर केल्यामुळे जी पदे निर्माण होतील त्या पदावर संबंधित विषयांच्या अतिरिक्त शिक्षकांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे सामावून घ्यावे.

५. अनुदान निर्धारण करतांना विद्यापिठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयांच्या विद्याशाखांना व तुकडयांना संलग्निकरण मंजूर केल्याची खात्री करून घ्यावी.

६. शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठांच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करणारे असावेत. शिक्षक संवर्गातील नेमणूकांना विद्यापीठाची मान्यता प्रदान केलेली असावी. मागासवर्गीय संवर्गाच्या आरक्षणाबाबत असलेल्या तरतूदींचे पालन करावे.

७. शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२७७/१२२११६/३२/संल दि.२१-९-७७ व शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०२६/८१५८/४१२६/विशी-४,दि.१९-४-८७ अन्वये महाविद्यालयास देण्यात येणारा वेतनाचा धनादेश बॅकेत/वेतन खात्यात जमा करण्यात येत असेल, त्याच बॅकेत त्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक खाते उघडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे बॅकेत जमा होणाऱ्या वेतनाच्या रकमेतूनच संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाती नियमाप्रमाणे वेतनाची रक्कम ट्रान्सफर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे संबंधित महाविद्यालये काटेकोरपणे कार्यवाही करीत आहे याची खात्री करून घ्यावी.

८. महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत/संलग्निकरणाबाबत शासनाने/विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता केलेली आहे

९. संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करणाऱ्या आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे.

१०. ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

११. संस्थेने महाविद्यालयांसाठी स्वतःच्या मालकीच्या पुरेशा इमारतींची वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधांच्या सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

१२. विद्यापीठांची रितसर परवानगी घेवून पूर्णवेळ प्राचार्यांची निवड समितीव्दारा नेमणूक करणे आवश्यक आहे.

१३. संस्थेविरूध्द कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.

१४. ज्या महाविद्यालयांना आर्थिक वर्षात रूपये २५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेचे अनुदान देय होईल, अशा महाविद्यालयांनी सी.ए.जी.(डी.पी.सी.) अधिनियम १९७१ मधील परिच्छेद १४ नुसार महालेखापाल यांच्या लेखापरिक्षा पथकाकडून लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

१५. शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशि-३, दि.१९/६/१९९५ अन्वये कार्यभार मंजूर करताना एका तुकडीतील शासनाने मंजूर केलेली विद्यार्थी संख्या विचारात घ्यावी.

१६. कॉम्पुटर सायन्स / अभियांत्रीकी विज्ञान व तदनुषंगीक विषयही पदवी स्तरावर विज्ञान व वाणिज्य विद्याशाखांकडे विषय म्हणून कायम विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यात येतात. नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावात अथवा अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा सूरू करण्याच्या प्रस्तावावर विद्यापीठाने हे विषय दिले असल्यास ते कायम विना अनुदान तत्वावर आहेत असे समजावे.

वरील महाविद्यालयाला वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन २००५-२००६ मधील आर्थिक तरतूदींमधून भागविण्यात यावा. तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून तरतूद उपलब्ध झाली तरच अनुदान अदा करण्यांत यावे.

२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ (०२) अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०४ (०२)(०१) अशासकीय वाङ्.मय विज्ञान वाणिज्य महाविद्यालयांना विस्तारासाठी अनुदाने (२२०२०९०५) ४१ सहाय्यक अनुदाने मागणी क्रमांक डब्ल्यू-२.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रति -

१ सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२ महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र , मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४ जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
५ मा.प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
६. प्राचार्य, कला महाविद्यालय,देऊर,ता.कोरेगांव,जिल्हा सातारा.